# देशातील असहिष्णुता:राजर्षी शाहू महाराजांची सामाजिक समता.

प्रा.डॉ.टी.एम्.पाटील.(राज्यशास्त्र विभाग)सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय मुरगूड - कोल्हापूर.
प्रा. शरद विठ्ठल पाटील. राज्यशास्त्र विभाग न्यू. कॉलेज कोल्हापूर.

**प्रस्तावना :-** भारतीय संघराज्यीय लोकशाहीत गेल्या सहा दशकांमध्ये अनेक बदल झाले आहेत. इथे आपण या अनुभावाची परिभाषा निश्चित करणारी वैशिष्ट्ये,सामाजिक समतेच्या माध्यमातुन पाहणार आहेत. स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय संघराज्यीय लोकशाहीत बदल हे काळानुरूप अंगीकारणे आवश्यक होते. बलाढ्य लोकशाही असलेल्या भारत देशाने नागरिकांसाठी अधिक अर्थपुर्ण हक्क व्यापित करण्याच्या प्रयत्नातुन स्वत:ला सातत्याने विकसीत करण्याच्या प्रयत्न केला. त्यांच्या विकासातील सहभाग आणि राष्ट्रीय धोरण यांच्यातील मतभेद यावर विचार करता आज असहिष्णुता यावर विचार करण्याची गरज आहे आणि यातुन देशातील असहिष्णुता राजर्षी शाहू महाराजांची सामाजिक समता या लेखाव्दारे सामाजिक समतेच्या माध्यमातुन शाहू महारांजानी आपल्या संस्थानामध्ये कशा प्रकारे समाजात समता निर्माण केली आणि समाजाला धर्मनिरपेक्ष वादाकडे घेउन गेले. यातुन समाजात सहिष्णुतेचे वातावरण निर्माण झाले त्यामुळे आजच्या देशाच्या सामाजिक परिस्थितीचा विचार करता सहिष्णु आणि असिहिष्णुता यातील मतभेद कमी करण्यासाठी शाहुच्या विचारातील समता मुल्यांचा अंगीकार प्रास्थापित विभुतीकडून झाला पाहीजे. तरच देशात शाहूच्या विचारातील समतेवर देशांत सहिष्णुता निर्माण होईल.

**उद्देश:-**

भारतीय घटनेच्या दरम्यान समतेच्या तत्वाचा समावेश केलेला आहे. घटनेच्या तिसऱ्या विभागात कलम १४ ते १८ मध्ये समतेचा अधिकार स्पष्ट केला आहे. भारतील सर्वे व्यक्तिंना कायदयासमोर समान मानले जाईल. समानतेची वागणूक, विकासाची समान संधी तसेच सामाजिक विषमता समतेच्या आधारावर नष्ठ करता येईल यासाठी शाहूच्या विचारातील समता प्रस्थापित करून देशात सहिष्णूता निर्माण करणे.

**विषय :-**

सहिष्णूता आणि अहिष्णुता यावरून सध्या देशात वाद होत आहें, परंतु दोन्ही वृत्ती माणसात असतात,फक्त कशाला किती महत्व दयायचे हे त्या व्यक्तीवर अवलंबून असते, नखं वाढवायची थांबत नाहीत ', तो पर्यंत ती श्वापद असतात , पण ही नख वेळीच काढली पाहिजेत ,कारण ती वाढली तर त्यांचा उपद्रव अधिक होतो, त्यामुळे देशांत असहिष्णुता अधिक प्रमाणात वाढली तर त्याचा उपद्रव समाजाला जास्त होईल आणि त्यामधुन देशांत सामाजिक ,आर्थिक आणि राजकिय असहिष्णुता निर्माण होईल .

देशातील असहिष्णुता निर्माण झाल्याचे वातावरण अशी सहिष्णू लोकांची तक्रार आहे. सरत्या वर्षी लोक सभे पासून साहित्य आकादमी पर्यंत सर्वत्र चर्चा चालु आहे. बिगर सहिष्णुवादयांचे म्हणने असे की, ही तक्रार व आरोप निव्वळ राजकारण प्रेरित असून खोटे आहेत. त्यांचा दावा आहे की,या देशाची संस्कृती हीच मुलत:सहिष्णू असून तिच्यासाठी असहिष्णूता ही परकीय गोष्ट आहे. या संस्कृतीत जन्मास येणारा माणूस जन्मत:च सहिष्णू असतो. या देशाची संस्कृती मानणारा असहिष्णू असू शकत नाही. या देशाचा इतिहास हा सहिष्णूतेचाच आहे.

सहिष्णुता आणि असहिष्णुता हा साधा सुधा प्रश्न नाही हा दोन संस्कृती मधील संघर्ष आहे. बुध्दपूर्ण संस्कृती सहिष्णू नव्हतीच बुध्दाने सांस्कृतिक क्रांती केली व सहिष्णू संस्कृती उदयास आली ', त्यानंतर इ.पू दुस-या शतकात पुष्य मित्र शुंगारे मनूच्या साह्याने प्रतिक्रांती घडवून आणली व भारतीय समाज पुन्हा विषमतेचा व अन्यायाचा बळी झाला त्यानंतर सुमारे बावीशे वर्षीनी भारताच्या राज्यघटनेते पुन्हा पुर्वी सारखीच क्रांती घडवून आणली व आधूनिक मुल्यांचे व सहिष्णूतेचे युग सूरू झाले. परंतु आता मनु सारखीच प्रतिक्रांती घडविण्याचे प्रयत्न सुरू झाले. आहेत. असहिष्णूतेचे वाढते वातावरण व घडणा-या घटना या पुढील प्रतिकांतीची नांदी होत, अशी ही आजच्या वातावरणाची विचारवंत रावसाहेब कसबे यांनी त्यांच्या मध्यमगार्मी सम्यक दृष्टितून केलेली मीमांसा आहे. त्यामुळे देशात सहिष्णुता आणि असहिष्णूता या दोन्ही वैचारिक विचारसरणीकडे शाहू महारांजाच्या समाजिक समता मधुन पहाणे आज काळाची गरज झाली आहे.

ज्यावेळी माणसाला स्वत:ची जाणीव झाली तेव्हा तो प्राणी सृष्टीतून मनुष्य प्राण्यात घेण्याचा प्रयत्न करत होता. स्वत:च्या जाणिवेतुनच त्याची संपत्ती ,सत्ता आणि मालकी जन्माला आली. कोण्या एकेकाळी स्वत:च्या टोळी पुरती जन्मला आलेली सत्ता जगभरात पसरली कुटूंबज्जेता, टोळीज्जेताने जगज्जेता असा त्याचा प्रवास सुरू झाला ज्ञान,तंत्रज्ञान ,श्रीमंती,प्रदेश, पाणी शेती अशी अनेक आयुधं त्याने सत्ता संपादनासाठी वापरली आणि ती टिकंवंनही ठेवली "सेल्फ व्हिलेज ते ग्लोबल व्हिलेज" या माणसाच्या २१ व्या शतकांतील लांबलचक प्रवासात माणूस प्राचीन काळापासून एकमेका पासुन दुरावत चालला आणि त्याची पुढची पायरी समाजात माणूसच माणसापासुन अस्थिर झाला.आज या अस्थिर वातावरणचे रूपांत्तर सहिष्णुता आणि असहिष्णुता मध्ये झाले.

माणवाचा झालेला प्रगतीचा प्रवास यामध्ये स्वनिर्मिती शेती , गांव ,तालुका ,जिल्हा ,राज्य आणि राष्ट्रांची निर्मिती आणि त्यानंतर निर्मिण झालेली आपली सत्ता ठिकवण्याची धडपड यातुन समाजात अनेक स्थित्यंत्तर झाली. या स्थित्यांत्तर मध्ये टोळी प्रमुखाच्या हातात सत्ता त्यानंतर मनु कडुन राज्य चालवण्यासाठी राजाची नियुक्त त्यानंतर समाजातील विचावंताच्या मधुन निर्माण झालेली लोक नियुक्त पध्दती असा राजाने लोक नियुक्त सरकार आशी समाजात निर्माण झालेली लोकशाही आशा लोकनियुक्त लोकशाही मध्ये असहिष्णूता मोठ्या प्रमाणात निर्माण होत आहे. समाजात असहिष्णूता निर्माण झाल्यास त्यामध्ये समाजाची वैचारीक प्रगती होत नाही. सरकारने धर्ये प्राप्त होत नाही. त्या राज्यातील लोकांना त्या राज्याविषयी आपला आपुलकीपणा वाटत नाही. त्यामुळे समाज्याची प्रगती होत नाही. आणि त्याचा परिणाम त्या राज्यातील असणा-या लोकनियुक्त सरकार किंवा राजावर होत असते. त्या राज्याला अधिम्यांता लाभत नाही.

आता पर्यंत आपण समाज निर्माती पासुन निर्माण होणारी असहिष्णूता आणि त्याचा होणारा परिणाम आपण विचारात घेतला देशांतील असहिष्णुता मुळे समाजात कशा प्रकारे वातावरण निर्माण झाले आणि त्याचा येणा-या समाजावर कशा प्रकारे परिणाम होत असतो ते आपण जाणून घेण्याचा प्रयत्न केला परंतु राजर्षी शाहू महारांजाची दुर दृष्टी पाहता त्यांनी आपल्या राज्यात निर्माण केलेल्या सामाजिक समतेचा विचार केला असता त्यांची समाजा प्रति असणारी बांधलकी आपल्याला समजावुन येतेसमाजात सामाजिक समता

प्रस्तापित केल्यानंतर त्या राज्याला लोक मान्यता किती प्रमाणात मिळते हे राजर्षी शाहू महारांजानी आपल्या कार्यातुन दाखवुन दिले आहे. त्यामुळे देशात सहिष्णुता निर्माण करण्यासाठी आज सुध्दा राजर्षी शाहु महारांजाचे विचार महत्वाचे आहेत. यामध्ये प्रामुख्याने राजर्षी शाहु महारांजांची समाजात समता मुल्यांची जी निर्मिती केली त्याची दखल नंतरच्या काळात भारतीय राज्य घटनाकाराणां घ्यावी लागली त्यानुसार भारतीय घटनेच्या आधारावर आज भारतात समता मुल्यांची रूजवण समाजात केली जात आहे. परंतु आज आपण समाजात निर्माण होणारी असहिष्णुता पाहतो त्यामुळे आज सुध्दा आपण शाहु महारांजानी विचारांची आणि कृतिची गरज आहे. आज सुध्दा आपल्याला आपल्याच देशात अस्थिर असल्याची जाणीव होत आहे. त्यामुळे आज देशातील असहिष्णूता चा विचार करताना शाहु महाराजांची सामाजिक समतेच्या मुल्यांचा आधारावर देशात सहिष्णूतापुर्वक वातावरण निर्माण करू शकतो.

प्रामुख्याने शाहु महाराजांचा कार्याचा कालखंड (जन्म हा २६जुन १८७४ -६ मे १९२२) या काळात झाला. हा काळ म्हणजे इंग्रजानी भारतात आपल्या सत्तेचा पाया घातला होता. त्याच्या पुर्वी भारतात फार प्राचीन काळी आपल्या समाजात प्रामुख्याने चार वर्ग होते त्यामध्ये शुद्र या वर्गीवर समाजातील इतर वर्गीची सत्ता होती आणि शुद्रांना सामाजिक ,आर्थिक आणि राजकिय स्वातंत्र्य आगदि नगद प्रमाणात होते. त्यामुळे आपल्या समाजात पुरोगामी विचारसरणी फार कमी प्रमाणात होती. प्रतिगामी विचांरावर समाज आपली वाटचाल करीत होता. त्या कालावधीत राजर्षी शाहु महारांजाचा राज्यभिषेकझाला आणि त्यांनी कोल्हापूर संस्थानाची गादी संभाळली त्यांनी आपल्या संस्थानामध्ये जी असहिष्णूता निर्माण झाली होती ती सामाजिक समता मधुन कमी करण्याचा प्रयत्न केला. फक्त प्रयत्न केला नसुन ती कमी करण्यासाठी त्यांनी प्रत्यक्ष कृतीचा वापर केला. त्यामध्ये त्यांनी आरक्षाणाचा क्रांतिकारी जाहीरनामा, अस्पृश्थताउध्दार शिक्षणप्रसार आणि अस्पृश्यतः निवारण, भटक्या विभुक्त जमातीचा उद्धार ,जातिभेद निवारण चळवळ स्त्री वर्गीच्या संरक्षाणाचे कायदे वसतिगृह चळवळीचा उदय व विकास आशा सामाजिक समता निर्माण करण्याच्या लोककल्याण कारी योजना समाजात राबवुन समता निर्माणाचे कार्ये केले. त्याचे फलित म्हणजे आज आपल्याला समाजात जी जात-जमाती मधील होणारी वैचारिक्ता देवाण - घेवाण पहावयास मिळते.

राजर्षी शाहु महारांजाची सामाजिक समता पाहिलीतर आपल्याला त्यांच्या विचारांची जाणीव होते प्रामुख्याने समता म्हणजे सर्वांना समानतेने वागणुक दिली जाईल तसेच कोणत्याही व्यक्तिला कायदयां समोर समानतेची वागणूक मिळाली पाहिजे कायदया समोर सर्व व्यक्ति समान मानल्या गेल्या पाहिजेत, सामाजिक न्याय प्रस्थापित होउन समाजाचा सर्वगीण विकास साधला पाहिजे अशा प्रकारे समाजातील समता प्रस्थापित करून शाहू महारांजानी आपल्या संस्थाना मधील समाजाचा सर्वांगीण विकास केला त्यामध्ये त्यांनी प्रामुख्याने आराक्षणाचा क्रांतीकारी जाहीरनामा , वसतिगृह चळवळीचा उदय व विकास , अस्पृश्यत:शिक्षणप्रसार आणि अस्पृश्यत:निवारण , जातिभेद निवारण चळवळ स्त्री वर्गीच्या संरक्षणाचे कायदे मुस्लिमांचे शिक्षण आणि हिंदू -मुस्लिम ऐक्य अशा प्रामुख्याने समाज्याच्या सर्वांगीण विकासावर आणि उन्नतीवर प्रभाव पाडणारे शाहु महारांजाचे सामाजिक समता विषयक विचार अभ्यासात येतील देशातील असहिष्णुता कमी करावयाची आपल्यास आज या विचारांची गरज आहे.

१९०२ मध्ये शाहू महारां एडवर्ड बादशहाच्या राज्यारोहण सभारंमास उपस्थित राहण्यास लंडनला गेले होते. तिकडे युरोपच्या दौ-यावर आसतानाच २६ जूलै रोजी एक अभुपूर्वी असा जाहीरनामा प्रसिध्द करविला तो असा होता. "सध्या कोल्हापूर संस्थानामध्ये सर्वे वर्गीच्या प्रजेस शिक्षण देण्याबाबत व त्याच उत्तेजुन देण्याबद्दल प्रयत्न केले आहेत परंतु सरकारच्या इच्छेप्रमाणे मागास केल्या लोकांच्या स्थितीत सदरहुन प्रयत्नास जितके यावे तितके थरा आले नाही हे पाहून सरकारां फार दिलगिरी वाटते. कारण या उंच प्रतिच्या शिक्षणा पर्यत मागास समाज पोहचत नाही आणि पोहचलाच तर त्याला संस्थानाच्या नोकरीत स्थान मिळणे कठिण होते त्यामुळे महारांजानी उंच प्रतिच्या शिक्षण घेतलेल्या नागरिकांस संस्थानाच्या नोकरीत बराच मोठा भाग या लोकां करिता निरंक राखून ठेवण हे दृड होईल असे सरकारांनी ठरविले आहे आणि त्याची प्रत्यक्ष अमंलबजावणी हा हुकूम पोहोचल्या तारखेपासुन रिकामे झालेल्या जागापैकी शेकडा पन्नास जागा मागासलेल्या लोकांना भराव्या तसेच ज्या ऑफिस मध्ये संध्या या प्रवर्गीतील लोकांचे प्रमाण ५०टक्के पेक्षा कमी असल्यास त्याच्या पुढील नेमणुका मागासवर्गातील लोकांच्या मधुन भराव्यात.

सुचना :-मागासलेल्या वर्गीचा अर्थ ब्राम्हण,प्रभु, शेणवी , पारशी व दुसरे पुढे गोलेले वर्ग खेरीज करून सर्वे वर्ग असा समजावा

**-शाहू छत्रपती.**

हिदुस्थानच्या इतिहासात आजवरच्या कोणाशी राजाने आपल्या प्रजेसाठी इतकी अप्रतिम भेट दिलेली नव्हती महाराजांचे एक चरित्रकार धनंजय कोर यांनी त्यांचे वर्णन 'नविन युगाच्या आगमनाची घोषणा करणारा अग्रदुत,अशा यथार्थ शब्दांनी केले आहे.शाहू महाराजांनी आपल्या संस्थानामध्ये सामाजिक समता निर्माण होण्यासाठी प्रथम उंच शिक्षणात उत्तेजन दिले आणि शिक्षण पूर्ण केल्यास संस्थानामध्ये नोकरीची हमी दिली अशा निर्णयाच्या आधारावर महाराजांनी समाजात समता निर्माण केला महाराजांनी आपल्या संस्थानामध्ये शिक्षणाच्या माध्यमातुन मागसलेल्या जातिच्या लोकांना नोक-यात आरक्षण ठेवलेया समाजात शिक्षणाची नवीन उमेद निर्माण केली. प्रस्थापित करण्यासाठी महाराजांनी हा आरक्षणाचा क्रांतीकारी जाहीरनामा प्रसिध्द केला.

महाराजांनी शिक्षण आणि शिकलेल्याना नोक-यात आरक्षण यामुळे मागासवर्गीतील अनेक तरूण उंच्च शिक्षणास प्रवाहात आले. परंतु त्याच्या आर्थिक परिस्थिती मुळे त्याना ते शिक्षण घेणे जमले नाही यासाठी विदयार्थीना आणि त्यामधून आपली प्रगती करणे या गोष्टी मागास वर्गीतील विदयार्थ्यां जमेणा आणि यासाठी महाराजांनी वसतिगृह चळवळीचा उदय व विकास करण्यात आला यामधून मागास विदयार्थी आपले शिक्षण कार्ये पूर्ण करून प्रशासनात नोक-या मिळविण्यास सक्षम झाले यातुन महाराजांनी शैक्षणीक समता निर्माण करण्याचे कार्ये केले यासाठी खालील प्रमाणे वसतिगृह चळवळची उदय व विकास झाला.

१८९६ सालीच,कोल्हापूरात उंच्च शिक्षणासाठी येणा-या विदयार्थ्यीसाठी राजाराम कॉलेजला जोडून एक वसतिगृह स्थापन केले होते हे वस्तीगृह प्रारंभी सर्वे जातीधर्माच्या मुलांसाठी खूले होते परंतु त्याच्यावर व्यवस्थापन ब्राम्हण मंडळाचे होते त्यामुळे इतर जातिच्याविदयार्थ्यांना त्या ठिकाणी जाचक व अपमानाची वागणूक दिली जात असे त्यामुळे त्या वसतिगृहावर नंतरच्या काळात ब्राम्हेणेत्तर मुलांची संस्था कमी झाली आणि साहजिकच ते वसतिगृह ब्राम्हण मंडळीच्या ताब्यात गेले त्यामुळे इतर मुलांच्या शिक्षणाची आणि राहण्याची सोय कोल्हापूरात होत नव्हती त्यातच १८९९ रोजी संस्थानातील वडगांव या गावच्या चिमणाजी पाटलांचा पांडुरंग हा मुलगा , मॅट्रीक परिक्षा पास झाला ही बातमी महाराजांना समजली त्यामुळे त्यांना मोठा आनंद झाला महाराजांनी त्याची प्रत्यक्ष बोलाहुन विचारानां केली असा एक वास्तव महाराजान समजलं कि ब्राम्हणेत्तर मुलांच्या राहण्याची आणि जेवणाची तसचे अभ्यासाची सोय कोल्हापूरात नाही त्यावर त्यांनी दुस-याच दिवशी रावसाहेब दाजीराव विचारे इंजिनिअर आणि रावसाहेब भास्करराव जाधव

अशी सरपूते यादीन मराठा अधिका-यांना बोलावून मराठा विदयार्थ्यांसाठी एक वसतिगृह काढण्याचा विचार केला.आणि या विचारातून पाहिले अपत्य हिटोरिया मराठा बोर्डिंग १८ एप्रिल १९०१ रोजी स्थापन झाले त्यानंतर मुस्लिम बोर्डिंगची स्थापना ,प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंगची स्थापना ,मदर ऑफ बोर्डिंग हाउसेस या सर्वे जाति धर्माच्या विदयार्थ्यांसाठी महाराजानी वस्तीगृहांची स्थापना केली. महाराजांच्या या कार्योतुन समाजात शिक्षणांची पुर्ण सोय करण्याचा संकल्प त्यांनी केला आणि तो पुर्णत्वास नेला यातुन महाराजांना शिक्षणीक बरोबर समाजिक समता प्रस्थापित करावयाची होती.

महाराजांनी जातिचा जाहिरनामा काढून शैक्षणिक प्रगतीसाठी वसतिगृहांची स्थापना केली असली तरी या शैक्षणीक कार्योन मागासवर्गीयच्या विदयार्थीची संख्वा फार नगण्य होती हे ज्यावेळी महाराजांना समजल त्यावेळी असे लक्षात आले कि सरकारी शाळामध्ये मागास वर्गीयतील मुलांना प्रवेश मिळत नाही त्याच्या वेगळया शाळा आहेत. त्याचा दर्जा खलावला आहे अशापरिस्थितीमध्ये महाराजांनी एखादया विदयार्थीने सरकारी शाळेत प्रवेश घेतल्यास त्याला अपमानाची वागणूक मिळत असते. म्हणुन महाराजांनी २४ नोव्हेंबर १९११ रोजी एक महत्वाचा आदेश काढला त्या अन्वये अस्पृश्य वर्गीय सर्वे प्रकारचे शिक्षण मोफत करण्यात आले. शिवाय हुशार विदयार्थीना वेळोवेळी खास शिष्यवृत्या दिल्या जाउ लागल्या यातुन मागास वर्गातील विदयार्थीच्या शिक्षणाची सोय झाली असली तरी त्यांची शैक्षणिक संस्थामधील असहिष्णूता संपली नव्हती म्हणून परत २८ सप्टेंबर १९१९ रोजी महाराजांनी संस्थानातील अस्पृश्यांच्या शाळा बंद केल्याच्या आदेश जारी केला. त्यात ते म्हणतात, "करवीर इलाख्यात अस्पृश्य लोकांच्या मुलांसाठी स्वंतत्र्य शाळा असतात. त्या सर्वे येत्या दस-यपासुन बंद करण्यात याव्यात व अस्पृशां दाखल करून घेत जावे. सरकारी शाळांतून शिवाशेब पाकण्याची नसल्याने सर्वे जातीच्या व धर्मांच्या मुलांस एकत्र बसविण्यात येत जावे."अशा प्रकारे महाराजांनी शैक्षणीक संस्थेमध्ये सामाजिक समता केली. यावरती महाराजांनी पुढची परिस्थिती विचारात घेउन जरी मागास विदयार्थीसाठी शिष्यवृत्या दिल्या आसल्या तरी त्या शिष्यवृत्ती देण्याचे कार्ये आखंड पणे चालु राहण्यासाठी १९२० मध्ये १० हजार रूपयांच्या प्रॉमिसरी नोटा तयार करून त्याच्या व्याजातून नंतर शिष्यवृत्या देण्याची व्यवस्था केली अशा प्रकारे शिक्षण क्षेत्रात अनेक अमुलाग्रह बदल करून महाराजांनी कोल्हापूर संस्थानात जी समता प्रस्थापित होण्याचे धोरणात्मक कार्ये केले. आहे.शाहु महाराजांनी शैक्षणीक कार्यारत समता निर्माण करून इतर क्षेत्रातील समतेचा विचार केला त्यामधुन त्यांनी दलितांची सेवा हीच खरी मानवेची सेवा, या थोर मानवतावादी भूमिकेवर महाराज आलेले दिसतात. या भूमिकेतून त्यांनी अस्पृश्यमुक्तीचा पाहिला आदेश २७ जूलै १९१८ ला मंजूर होउन कोल्हापूर गॅझेटमध्ये ३ ऑगष्ट १९१८ रोजी प्रसिध्द झाला त्यानुसार अस्पृश्यावर लादलेल्या अमानुष अशा हजेरी च्या पध्दतीचे निर्मूलन करण्यात आले. त्यानूसार महार, मांग ,रामोशी व बेरउ या चार जातीच्या लोकांची हजेरी बंद करण्यात यावी. यातील ते कुणी गुन्हात सापडुन शिक्षा झालेल असतील त्यांना मात्र या हुकूमाने हजेरीची माफी नाही. अंमल ताबडतोब करण्यात यावा अशा प्रकारे महाराजांच्या पुढाकाराने हजेरीची प्रथा बंद करण्यात आली ही प्रथा बंद करण्याचे कारण महाराजांनी माणगांव परिषदेतील भाषणात सांगितले की,ज्या अधिका-याकडे हजेरी लावल्यात येत होती तो अधिकारी त्या जातीच्या लोकांच्या कडून फूकट काम करून घेत असत त्यामुळे त्या जातीच्या लोकांना गुलामगिरीप्रमाणे काम करावे लागत असे त्यामुळे गुलामगिरीपेक्षासुध्दा या विसाव्या शतकात अशा प्रकारची गुलामगिरी चालत होती. त्यामुळे महाराजांची या जातीच्या लोकांची हजेरीची प्रथा बंद करून समाजात समता निर्माणकेली.

महाराजांना हजेरीच्या पध्दतील बंदी केलीच त्याच्या बरोबर वेठवरळा पध्दतीचे निर्मुलन , म्हारवतन खालसा अस्पृश्यता निवारणाचे चार जाहीरनामे अशा प्रकारे महाराजांनी हुकूम काढून समाजात कोणत्या ही जाती धर्मावर अन्याय होणार नाही याची खबरदारी घेतली त्यामुळे महारांजांच्या कार्यात पूर्ण सामाजिक समतेची कास भरलेली होती असेच पहावयास दिसते. असे असेल तरी महाराजांनी फक्त हूकूम जाहीरनामे काढून सामाजिक समता निर्माण केली नाहीतर सामाजिक समता निर्माण होण्यासाठी प्रत्यक्ष कृतिवर जास्त भर देण्यात आला त्यातुनच त्यांनी ७ ऑगष्ट १९१८ रोजी खास हुकूम काढली होती त्यामध्ये अस्पृश्य जातीचे लोकांनी आपल्या कर्तेगारीने व बुध्दीने पुढे येतील त्यांना माग कारकून व अव्वल कारकुन अशा प्रकारच्या जागा देण्यात याव्यात यामुळे अस्पृश्य जातीच्या हुशार लोकांची संख्या प्रशासनात वाढली. तसेच त्यांनी म्युनिसिपार्टीच्या चेअरमनपदी अस्पृश्याची - दतोबा पोवार यांची नेमणुक केली तसेच म्युनिमिपार्टिच्या कारभारात मांगसमाजाचाही प्रवेश केला त्यामुळे प्रशासनात आणि राजकारणात महाराजांच्या प्ररणेनेसमता निर्माण झाली आपल्या माहुत कोचमन ड्रायव्हर कुतेवाला या ठिकाणी अस्पृश्यांच्या नेमणूका केल्या यातून त्यांनी वैयक्तिक समता निर्माण करण्यासाठी प्रत्यक्ष कृतिचा अवलंब केला. १९०८ साली राजकण्या आक्कासाहेब यांच्या लग्नाच्या वरातीत कंबरेस तलवारी बांधलेले गाडया घोडयांवरील रूबाबदार अस्पृश्य कोचमनानी व राजेशाही हत्तीवरील संस्थानी पोशाखातीलमाहुतांची नेमणुक करून आपल्या बरोबर समस्त अस्पृश्य समाजाचीही प्रतिष्ठा वाढविली होती. महाराजांचा तो एक सामाजिक प्रयोगच होता.

अशा प्रकारे महाराजांनी अनेक सामाजिक प्रयोग केले त्यामध्ये प्रामुख्याने अस्पश्यांच्या हातच्या अलोदकांचा जाहीर स्वीकार , गंगाराम कांबळेची कथा, भटक्या -विभुक्त जमातीचा उधार फासेपारध्यावर गुन्हेगार समाज म्हणून सर्वात शिक्का होतो तो नाहिसा करण्यासाठी महाराजांनी आपल्या निवासस्तानच्या संरक्षणाची जबाबदारी त्याच्यावर सोपविण्याचे निश्चित केले. आणि सोनतळी कॅम्पच्या खास पहा-यावरचे नेमले गेले.अशातुन महाराजांच्या सामाजिक समतेचे दर्शन होते.

महाराजांनी आपल्या कार्यात समाज्याच्या सर्वागीण बाजूस समता प्रस्थापित करण्यासाठी अंतर जातीय विवाहाचा कायदा मंजूर केला १९१७ च्या जुलैमध्ये त्यांनी आपल्या संस्थानात विधवांच्या पुर्नविवाहास कायदेशीर मान्यता देणारा कायदा समंत केला . त्याच बरोबर घटस्फोटाचा व वारवाचा कायदा देवदासी प्रथा प्रतिबंध कायदा अशा प्रकारे शाहू महाराजांनी हे कायदे म्हणजे स्त्रियांच्या सामाजिक स्वातंत्र्याच्या रक्षणाचे कायदे होते. महाराजांचा कारभार किती पुरोगामी होता, याची साक्ष हे कायदे देतात.शाहू महाराजांच्या कार्योचा आपण अभ्यास केल्यास त्याच्या प्रत्येक कार्योत सामाजिक समता प्रस्थापित होईल अशाच प्रकारेचे आहे. त्यांनी प्रामुख्याने शिक्षण अस्पृश्यता समाज प्रस्थापन स्त्रीयांचे शिक्षण , सामाजिक प्रथा आणि परंपरा याच्यामध्ये अमुलागृह बदल केला हा बदल करता त्यानी समाजावर प्रदिध परिणाम होणारे कायदे समत करून त्याचा योग्य अमंलबजावणी होईल अशी व्यवस्था निर्माण केली त्यांनी सामाजिक ऐक्य निर्माण होण्यासाठी हिंदु -मुस्लीम ऐक्य आणि मुस्लिांचे शिक्षण याकडे लक्ष दिले. यावरून राजर्षी शाहू महाराजांचे हे सामाजिक कार्ये समाजावर अमूलागृह परिणाम करणारे होते त्यानी आपल्या कार्योतुन समाजात असहिष्णूता होती आणि तीला ब्राम्हणनांचा अभय होता त्याच्या विरोधात आपले कार्ये केले आणि आपल्या संस्थानामध्ये सहिष्णूता निर्माण करण्याचे संकल्प केला व

तो पुर्णत्वास नेला. आजच्या परिस्थितीमध्ये शाहू महाराजांच्या विचाराचा जागर झाल्यास आपल्या देशात जी निर्माण झालेली असहिष्णूता आहे असेम्हणणा-या व्यक्ति समुहामध्ये सहिष्णूता निर्माण होईल त्यामूळे शाहु महाराजांचे विचारआज २१व्या शतकात सुध्दा समाजात सहिष्णूता निर्माण करण्यासाठी महत्वाचे आहेत आसेच म्हणता येईल.

देशापुढे सध्या अनेक आर्थिक सामाजिक राजकीय आणि सांस्कृतिक आव्हाने वाढती बेरोजगारी आणि विषमता माहागाई दैनिक व्यवहारांचा भाग झालेला भ्रष्टाचार नेहमीच्या प्रश्नाबरोबर धार्मिक व जातीय भेद असहिष्णूता या प्रश्नांचे स्वरूप जटील झाले आहे. असहिष्णूता म्हणजे व्यक्तिच्या प्राकृतिक अधिकार आणि मुलभूत अधिकार प्रव्यापित गटाकडून झालेले अक्रमण होय.सहिष्णुता म्हणजे प्रत्येक व्यक्ति जन्मत:च समान आहेत असा समातेचा विचार मांडला आहे मानवामानवांमध्ये कोणत्याही आधारावर भेदभाव न करणे आणि प्रत्येकाला आपल्या व्यक्तित्वाचा विकास करण्याची समान संधी देणे होय.

मधुयुगीन काळात वंशश्रेष्ठत्वाचा आधारावर व्यक्तिची प्रतिष्ठा ठरविण्यात येत असे व्यक्तिला तिच्या जन्मानुसार सामाजिक दर्जा आणि त्या दर्जाला अनुकूल असे विशेषधिकार मिळत असत. जाति व्यवस्थेमुळे जाती -जातीमध्ये श्रेष्ठता निर्माण होउन विषमता निर्माण झाली होती ती विषमता समाजाच्याअधोगतीसाठी . कारणीभुत होती. त्यामुळे राजर्षी शाहु महाराजांनी आपल्या कार्यातुन सामाजिक समता निर्माण केली.

**समारोप:-**

आजच्या काळात शाहुच्या सामाजिक समता मुल्यांचा आधारावर समाज शांतता निर्माण करता येईल. राजर्षी शाहूनी आपल्या संस्थानामध्ये समता मुल्य स्वीकारून धर्मनिरपेक्षता निर्माण करण्याच काम केले. भारतीय घटनेचे सर्व नागरिकांना विकासाची समान संधी दिलेली असली तरी आज सुध्दा समाजात असहिष्णुतेचे वातावरण निर्माण होत आहे हाच चितनांचा विषय आहे. देशातील सामाजिक समता मुल्यांच्या बळकटीसाठी शाहू महारांजाची सामाजिक समता आवश्यकता आहे. देशातील असहिष्णुता राजर्षी शाहू महारांजाच्या सामाजिक समता या विचारांना नाहिशी करता येईल. त्यामुळे देशाची आज वरची असहिष्णुता शाहु महारांजाची सामाजिक समता या विचारात सहिष्णू वातावरण निर्माण होईल. त्यामुळे आजच्या काळात शाहूची सामाजिक समतेशिवाय आपल्याकडे दुसरा कोणताही पर्याय नाही.

**संदर्भ सुची :-**

१. पवार,जयसिंगराव : राजर्षी शाहू छ. जीवन व कार्य.
२. के. सागर : राज्यशास्त्र सिध्दांत आणि राजकिय विचार.
३. नियत कालिके व वृत्तपत्रे : लोकसत्ता जाने. २०१६ सकाळ दिवाड.
४. प्रा.बी.बी. पाटील, प्रा.सौ. उर्मिला चव्हाण : वी.ए. भाग एक सेम - १ English
५. प्रबोधन प्रकाशन ज्योती फुले. .